# मेट्रो-३ चे आणखी १.१३ किमीचे भुयारीकरण पूर्ण

## आतापर्यंत २० किलोमीटरचे काम मार्गी; कुलाबा ते वांद्रे हा पहिला टप्पा डिसेंबर २०२१ पर्यंत कार्यान्वित

**प्रतिनिधी, मुंबई**

**कुलाबा-वांद्रे**-सीप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गिकेमधील पाली मैदानापासून आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतच्या १.१३ किलोमीटर भुयाराचे काम बुधवारी पूर्ण झाले. मेट्रो-३ प्रकल्पातील हे आजवरचे पाचवे भुयार आहे. ५२ किलोमीटरच्या संपूर्णपणे भुयारी मार्गिका असणाऱ्या या प्रकल्पाचे आतापर्यंत २० किलोमीटरचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

मेट्रो-३ या भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम सध्या शहरात वेगाने सुरू आहे. यामधील कुलाबा ते वांद्रे हा पहिला टप्पा डिसेंबर २०२१ पर्यंत कार्यान्वित केला जाणार आहे. भुयारीकरणाच्या कामासाठी १७ टीबीएम यंत्र शहराच्या भूगर्भात कार्यरत आहेत. या प्रकल्पातील चार भुयारे पूर्ण झाली असून पाचवे भुयार बुधवारी पूर्ण झाले. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये मरोळ येथील पाली मैदानातील विवरातून भुयारीकरणाला सुरुवात केलेले 'वैनगंगा-३' हे टीबीएम यंत्र बुधवारी आंतरराष्ट्रीय विमानतळानजीकच्या विवरातून बाहेर पडले. या यंत्राने ३१८ दिवस भुयार खणण्याचे काम केले. १५० निष्णात अभियंते, तंत्रज्ञ आणि कुशल कामगारांनी ९३७ आरसीसी सिमेंट रिंग्सचा वापर करून भुयाराचे काम पूर्ण केले. यापूर्वी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील विवरात 'वैनगंगा-१' हे टीबीएम यंत्र भुयार खणून बाहेर पडले होते.

मरोळ नाका ते आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यानचा बेसाल्ट, ब्रेशिया अशा कठीण खडकांना भेदण्याचे काम 'वैनगंगा-३' यंत्राने केले. हे यंत्र ९२ मीटर लांबीचे असून त्याने प्रतिदिन ४.१२ मीटर इतक्या वेगाने भुयारीकरणाचे काम केले. या यंत्राने वर्सोवा-घाटकोपर मेट्रो-१ मेट्रो, सहार उन्नत मार्ग यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पाखालून भुयार खणले. मेट्रो-३ चे आंतरराष्ट्रीय विमानतळ हे स्थानक मेट्रो-१ च्या मरोळ नाका आणि जोगेश्वरी-विक्रोळी या प्रस्तावित मेट्रो-६ मधील जेव्हीएलआर या स्थानकाला जोडणार असल्याची माहिती 'एमएमआरसी'च्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी दिली.

